समुद्रातील दुर्मिळ प्रजाती मासेमारी जाळ्यात अटकल्यानंतर त्यांची सुटका करण्याकरिता मच्छिमारांना देण्यात येणाऱ्या अनुदानात बदल करणेबाबत...

# महाराष्ट्र शासन
## कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
## शासन शुद्धीपत्रक क्रमांकः मत्स्यवि-१११८/प्र.क्र. ७५/पदुम-१४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ०८ जानेवारी, २०२१

वाचा :

१) समक्रमांकाचा शासन निर्णय दि. २१.१२.२०१८

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे पत्र क्र. कां.क/ल.ले/१०२८/ सन २०२०-२१, दि. ०२.१२.२०२०

## शासन शुद्धीपत्रक

उपरोक्त वाचा येथील शासन निर्णयान्वये मच्छिमारांनी सागरी प्रजातींचे रक्षण करण्याकरिता त्यांच्या जाळ्यांमध्ये अटकलेल्या दुर्मिळ प्रजातींची सुटका करण्याकरिता त्यांचे जाळे फाडून/कापून दुर्मिळ प्रजातीची सुटका केल्यास मासेमारी जाळ्याच्या नुकसान भरपाई पोटी त्या मच्छिमारास रू. २५,०००/- इतके अनुदान देण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती. आता (वाचा-२) येथील अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांच्या पत्रात प्रस्तावित केल्याप्रमाणे मच्छिमारांना द्यावयाच्या अर्थसहाय्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता प्रदान करत आहे.

| अ.क्र. | वन्यजीव संरक्षण कायदा अंतर्गत सुरक्षित असलेल्या समुद्री प्रजाती | आर्थिक वर्षात प्रथम अर्जासाठी जास्तीत जास्त भरपाईची रक्कम (रू.) | आर्थिक वर्षात दुसऱ्या वेळेच्या अर्जासाठी जास्तीत जास्त भरपाईची रक्कम (रू.) | आर्थिक वर्षात तिसऱ्या अर्जासाठी जास्तीत जास्त भरपाईची रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|
| १ | कासवांच्या प्रजाती - ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन सी कासव, लॉगर हेड कासव, हॉक्सबील कासव, पॉक्युपाईन रे (काटदेर पाकट) | १२,५००/- | १०,०००/- | ८,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | व्हेल शार्क (बहिरी मासा), गॅन्जेटीक शार्क (खादर), पॉडेचरी शार्क, सॉ फीश (करवत मासा), जॅंट गिटार फीश (लांजा), लेदरबॅक कासव, डॉल्फिन व व्हेल मासे (सर्व समुद्री सस्तन प्राणी) | २५,०००/- | २०,०००/- | १५,०००/- |

तसेच एका आर्थिक वर्षात एका अर्जदाराला जास्तीत जास्त ३ वेळेस नुकसान भरपाई मिळू शकेल.

सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२१०१११११००५०२४०१ असा आहे. हे शुद्धीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHASTRI SHRINIVAS
JAGANNATH

Digitally signed by SHASTRI SHRINIVAS JAGANNATH
DN: c=IN, o=Personal,
2.5.4.20=3daac6215e89f523493e2781dea288fb19797b5336d9582
442dca0d60b1b0a5b, postalCode=410210, st=MAHARASHTRA,
serialNumber=c02f19ac7e7ab3a50d817c95cf483e33229cf0cbb032
83b175900630f81d2337, cn=SHASTRI SHRINIVAS JAGANNATH
Date: 2021.01.11 11:07:10 +05'30'

**( श्रीनिवास शास्त्री )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
५. प्रधान सचिव (पदुम), मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
७. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण.
९. जिल्हाधिकारी, पालघर/ठाणे/मुंबई शहर/मुंबई उपनगर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
१०. सह आयुक्त (सागरी), मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय, कोकण विभाग, मुंबई.
१२. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, पालघर/ठाणे/मुंबई शहर/मुंबई उपनगर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग.
१३. महालेखापाल (लेखापरीक्षक/लेखा अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
१४. निवडनस्ती.